सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

## सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५

# महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४

(दिनांक २६ जानेवारी २०१६ पर्यंत सुधारित)

## Maharashtra Act No. V of 1965

# Maharashtra Official Languages Act, 1964

*(As Modified upto 26th January 2016)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

**२०१६**

[ **किंमत :** रु. १८-०० ]

# महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४

## अनुक्रमणिका

**उद्देशिका.**


| **कलमे.** | | | | **पृष्ठे** |
|---|---|---|---|---|
| १. | लघु संज्ञा, विस्तार व प्रारंभ | ... | ... | १ |
| १अ. | राज्याची राजभाषा मराठी असणे | ... | ... | १ |
| २. | व्याख्या. | ... | ... | १ |
| ३. | राज्य विधानमंडळातील वापरासाठी इंग्रजी भाषा चालू ठेवणे | ... | ... | २ |
| ४. | राज्याच्या शासकीय प्रयोजनांसाठी राजभाषा | ... | ... | २ |
| ५. | विधेयके, वगैरेमध्ये मराठी भाषेचा वापर करणे | ... | ... | २ |
| ६. | नियम करण्याची शक्ती. | ... | ... | २ |


(शा.म.मु.) एच ४१४७ (२५२४—२-२०१६)

# सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५[१]

## (महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४)

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** दिनांक ११ जानेवारी १९६५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

या अधिनियमात पुढील सुधारणा अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आली :—

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ (३-१-१९९६)*

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ (२१-८-२०१५)*

**राज्याच्या विधानमंडळाची प्रयोजने समाविष्ट करून राज्याच्या शासकीय प्रयोजनांकरिता उपयोगात आणावयाच्या भाषांचा अंगीकार करण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, राज्याच्या विधानमंडळाची प्रयोजने समाविष्ट करून राज्याच्या शासकीय प्रयोजनांकरिता उपयोगात आणावयाच्या भाषांचा अंगीकार करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंधराव्या वर्षी याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

लघु संज्ञा, विस्तार व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ असे म्हणावे.

(२) तो सबंध महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) हे कलम आणि कलम ३ ही दिनांक २६ जानेवारी १९६५ रोजी अंमलात† येतील ; आणि या अधिनियमाचे बाकीचे उपबंध, राज्य सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमील त्या† तारखेस अंमलात येतील ; आणि या अधिनियमाच्या निरनिराळ्या उपबंधांसाठी किंवा त्या उपबंधात निर्दिष्ट केलेल्या निरनिराळ्या बाबींसाठी निरनिराळ्या तारखा नेमता येतील.

राज्याची राजभाषा मराठी असणे.

[२][**१अ.** महाराष्ट्र राज्याची राजभाषा मराठी असेल.]

व्याख्या.

**२.** संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "नेमलेला दिवस" या संज्ञेचा अर्थ, कलम ३ च्या संबंधात दिनांक २६ जानेवारी १९६५ आणि या अधिनियमाच्या इतर कोणत्याही उपबंधाच्या संबंधात किंवा त्या मधील कोणत्याही बाबीसंबंधीच्या अशा कोणत्याही उपबंधाच्या संबंधात ज्या तारखेस तो उपबंध किंवा त्या बाबीसंबंधीचा कोणताही उपबंध अंमलात येईल ती तारीख असा समजावा ;

(ब) "संविधान" म्हणजे भारताचे संविधान ;

---

[१] उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी, **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९६४, भाग पाच, जादा पृष्ठ ३६४ पहा.

* अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

† शासकीय अधिसूचना, सा. प्र. वि. क्रमांक ओएफएल-१०६६ (एक)-एम, दिनांक ३० एप्रिल १९६६ अन्वये कलमे ४ व ६, १ मे १९६६ पासून अंमलात आली.

† शासकीय अधिसूचना, सा. प्र. वि. क्रमांक ओएफएल-१०९५/७३७/सीआर-३६/९५/२०-बी, दिनांक १४ ऑगस्ट १९९५ अन्वये कलम ५, दिनांक १५ ऑगस्ट १९९५ पासून अंमलात आले.

[२] सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम २ द्वारे, समाविष्ट केले.

[१][(क) "मराठी" याचा अर्थ, वेळोवेळी काढण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये राज्यात जिचा अंगीकार केला आहे अशी देवनागरी लिपीतील मराठी भाषा, असा आहे.]

राज्य विधानमंडळातील वापरासाठी इंग्रजी भाषा चालू ठेवणे.

**३.** संविधानाच्या अनुच्छेद २१० मध्ये नमूद केलेला संविधानाच्या प्रारंभापासूनचा पंधरा वर्षांचा कालावधी समाप्त झाला तरी, नेमलेल्या दिवसांपासून राज्याच्या विधानमंडळातील कामकाज चालविण्याकरिता हिंदी व मराठी या भाषांखेरीज इंग्रजी भाषेचा वापर करणे चालू ठेवता येईल.

राज्याच्या शासकीय प्रयोजनांसाठी राजभाषा.

**४.** या अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून, नेमलेल्या दिवसापासून मराठी ही, राज्य सरकार **राजपत्रात** वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या नियमांद्वारे निर्दिष्ट करील अशा प्रयोजनांव्यतिरिक्त संविधानाच्या अनुच्छेद ३४५ मध्ये उल्लेख केलेल्या सर्व शासकीय प्रयोजनांकरिता महाराष्ट्र राज्याच्या संबंधात उपयोगात आणावयाची भाषा असेल ; आणि अशा वर्जित प्रयोजनांकरिता राजभाषा म्हणून हिंदीचा उपयोग करता येईल.

विधेयके वगैरे मध्ये मराठी भाषेचा वापर करणे.

**५.** नेमलेल्या दिवसापासून—

(अ) राज्याच्या विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात आलेली विधेयके (किंवा त्यांस सुचवावयाच्या दुरुस्त्या) यात ;

(ब) राज्याच्या विधानमंडळाने संमत केलेले सर्व अधिनियम आणि संविधानाच्या अनुच्छेद २१३ अन्वये महाराष्ट्राचे राज्यापाल यांनी प्रख्यापित केलेले सर्व अध्यादेश यात ;

(क) संविधानान्वये किंवा संसदेने किंवा राज्य विधानमंडळाने केलेल्या कोणत्याही विधिअन्वये राज्य सरकारने केलेले सर्व आदेश, नियम, विनियम आणि उपविधी यात ;

मराठी भाषेचा वापर करण्यात येईल :

[२][परंतु, राज्य शासनास, खंड (अ) ते (क) यांच्या प्रयोजनांकरिता, विशेष परिस्थितीनुसार किंवा तांत्रिक कारणांकरिता, इंग्रजी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे अशी त्याची खात्री पटली असेल, तर तसे करता येईल.]

नियम करण्याची शक्ती.

**६.** (१) राज्य सरकारला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी नियम करता येईल.

(२) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात आला पाहिजे ; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगेचनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर तो नियम, अशा निर्णयाची अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति तो नियम अंमलात येणार नाही. तथापि, त्या नियमात अशा रीतीने कोणतेही फेरफार केल्यामुळे किंवा तो नियम रद्द केल्यामुळे त्या नियमान्वये पूर्वी कलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

---

[१] सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम ३ द्वारे, खंड (क) ऐवजी हा खंड दाखल केला.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ द्वारे हे परंतुक समाविष्ट केले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई